मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अजित पवार यांचा पुनावळेकरांना दिलासा?

## कचरा डेपोवर तोडगा काढण्याचे दिले आश्वासन

**हिंजवडी । न्यूज एक्स्प्रेस मराठी ।** पुनावळे येथील प्रस्तावित कचरा डेपोबाबत स्थानिक नागरिकांच्या शिष्टमंडळाचे मत आणि म्हणणे जाणून घेतले आहे. आता महापालिका प्रशासनाची भूमिका जाणून घेतल्यानंतरच कचरा डेपोवर काय तो तोडगा काढू, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुंबईत बुधवारी (ता. २३) दिल्याने पुनावळेकरांना काहीसा दिलासा मिळाला आहे. पुनावळेतील प्रस्तावित कचरा डेपोच्या विरोधात स्थानिक नागरिकांनी मी पुनावळेकर ही मोहीम हाती घेतली आहे. त्यांनी उपमुख्यमंत्री पवार यांची भेट घेतली नागरिकांची बाजू मांडत निवेदनही दिले. यावेळी मोठ्या संख्येने पुनावळे ग्रामस्थ व सोसायटी प्रतिनिधी उपस्थित होते.



महापालिका विकास आराखड्या नुसार पुनावळेतील मोकळ्या जागेत कचरा डेपोचे आरक्षण आहे. परंतु, सध्या सभोवताली अनेक मोठे गृहप्रकल्प निर्माण झाले आहेत. देशाच्या कानाकोपऱ्यातून नागरिक येथे वास्तव्यास आल्याने प्रचंड लोकसंख्या वाढली आहे त्यामुळे डेपोला नागरिकांनी तीव्र विरोध आहे. गेल्या काही दिवसांपासून पुनावळेत कचरा डेपा सुरू करण्याबाबत प्रशासकीय हालचाली सुरू आहेत. त्यामुळे या भागातील सुमारे ३० हजार नागरिक चिंतेत आहेत. बांधकाम व्यावसायिकांनी गृहप्रकल्प बांधून पूर्ण केले आहेत. सदनिकाधारक नागरिकांनी कोणाकडे दाद मागावी असा प्रश्न उपस्थित झाला आहे. हिंजवडी आयटी हबला लागूनच हा डेपो निर्माण होणार असल्यामुळे आयटी आणि उच्चशिक्षित लोकांमध्ये प्रशासन आणि लोकप्रतिनिधीं बाबत नाराजाचीचा सूर आहे.

### आरक्षण स्थलांतराची ग्रामस्थांची मागणी

» कचरा डेपो ही गरज आहे त्यामुळे तो रद्द करण्याऐवजी ज्या ठिकाणी भविष्यात गृहप्रकल्प होणार नाहीत अशा शासकीय जागेत कायदेशीर बाबींच्याआधारे आरक्षण स्थलांतरीत करण्याची सकारात्मक भूमिका घ्यावी तशी जागा आम्ही सूचवू अशी मागणी ग्रामस्थांनी केली. याबाबत शुक्रवारी (ता. २५) महापालिका आयुक्त शेखर सिंह, व सोसायटी धारकांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करू आणि दोन्ही बाजू ऐकून तोडगा काढू असे आश्वासन पवार यांनी दिल्याने आज होणाऱ्या बैठकीकडे पुनावळेकरांचे लक्ष लागले आहे.

# 'सुविधा पार्क' सोसायटीच्या रस्त्याला 'हिरवा कंदिल'

## १३ वर्षांपासूनचा प्रश्न सुटला; स्थानिक सोसायटीधारकांना मिळाला दिलासा

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग अर्थात 'सीएमई'च्या हद्दीतील पुणे-नाशिक महामार्ग ते भोसरीतील सुविधा पार्क सोसायटीला जोडणारा १२ मीटर रस्ता विकसित करण्यासाठी संरक्षण विभागाकडून परवानगी मिळाली आहे. त्यामुळे स्थानिक सोसायटीधारकांना दिलासा मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे भोसरी येथील स.नं.६८९, ६९० रहिवाशी विभाग दर्शविलेला असून, पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.५० पासून सी.एम.ई. गेटकडे जाणारा रस्ता आहे. सन २०१० मध्ये सी. एम. ई. कडून सदर भागासाठी असलेला पोहच रस्ता संरक्षण विभागाचा असल्याने नागरीकांच्या वाहतुकीस सदर रस्ता बंद करण्यात आला होता. परिणामी, सुविधा पार्क सहकारी गृहरचना संस्थांच्या रहिवाश्यांनी न्यायालयाकडे दाद मागितली होती. परंतु, ही याचिका न्यायालयाने फेटाळली होती. दरम्यान, सदरचे क्षेत्र महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली आलेपासून पुणे- नाशिक रस्त्यापासून सी.एम.ई. गेटकडे जाणा- या सदर रस्त्याचे वेळोवेळी महानगरपालिकेमार्फत डांबरीकरण करण्यात आलेले आहे. तसेच, स्टेशन हेड कार्टर खडकी येथे दि.०७/०९/२०२१ रोजी एकत्रित बैठक घेण्यात आली. त्यानुसार, संरक्षण विभागाकडून महानगरपालिकेकडे मनपा प्रयोजनासाठी जागा हस्तांतरीत करणेबाबत सहमती दर्शवली होती. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडून भोसरी येथील सुविधा पार्क व बाजूच्या रहिवास भागासाठी असलेला पोहच रस्ता मिलीटरी विभागाकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबतचा प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने आवश्यक तपशील व नकाशा संरक्षण मंत्रालय, दिल्ली यांना सादर करण्यात आला होता. त्याला संरक्षण विभागाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.



> माझ्या राजकीय जीवनाची सुरूवात ज्या परिसरातून झाली. त्या परिसरातील सुविधा पार्क व समर्पण सोसायटी आणि सभोवतालच्या भागातील नागरिकांचा रस्त्याचा प्रश्न गेल्या १३ वर्षांपासून प्रलंबित होता. सुमारे ७५ हून अधिक सदनिकाधारकांना रस्ताच नव्हता. त्यामुळे सोसायटीधारक नागरिकांनी न्यायालयातील याचिका मागे घेतली. त्यामुळे संरक्षण विभागाने सकारात्मक भूमिका घेत सदर रस्ता महापालिका प्रशासनाकडे हस्तांतरण करण्यास परवानगी दिली आहे. अत्यंत गुंतागुंताचा हा प्रश्न महापालिका, रहिवाशी आणि संरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सामंजस्याने मार्गी लावला. प्रशासनाने पुढील कार्यवाही करुन रस्त्याचे काम पूर्ण करावे.
>
> – **महेश लांडगे**, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

### असा निघाला तोडगा!

» सुविधा पार्क सोसायटीचे सदस्य व महानगरपालिकेचे अधिकारी तसेच स्टेशन कमांडट, स्टेशन हेड क्वार्टर, खडकी, डिफेन्स इस्टेट ऑफिस, पुणे यांच्या समवेत महापालिका आयुक्त यांच्या दालनात आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने बैठक झाली होती. यामध्ये सुविधा पार्क सोसायटीचे सदस्य न्यायालयातील प्रकरण मागे घेतील आणि महापालिकेने पाठविलेला प्रस्ताव संरक्षण मंत्रालयाद्वारे स्वीकारला जाईल व ही जागा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केली जाईल. तसेच सुविधा पार्क सोसायटी सदस्यांनी न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत ७ दिवसांत सादर करण्याचे निश्चित झाले होते. त्यानुसार, सुविधा पार्क सोसायटीच्या प्रतिनिधींनी दावा मागे घेतल्यानंतर संरक्षण विभागाने दि.२३/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदरचा रस्त्याचे काम करण्यासाठी परवानगी दिली आहे.

# राष्ट्रवादीमधील फुटीनंतर अजितदादा आज पहिल्यांदाच पिंपरी चिंचवडमध्ये!

## जंगी स्वागत, नागरी सत्कार, पालिकेत बैठक अन् कार्यकर्ता मेळावा

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राष्ट्रवादीमधील फुटीनंतर अजितदादा पवार उद्या (दि.२५) पहिल्यांदाच पिंपरी चिंचवड शहरामध्ये येत आहेत. उपमुख्यमंत्री झाल्यानंतर ते शहरात येत असून जंगी स्वागत अन् सत्कार, महापालिकेत बैठक आणि कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबतची माहिती राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दिली आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे पिंपरी चिंचवड शहरात उद्या शुक्रवार (दि.२५) रोजी सकाळी ९.४५ वाजता येत आहेत. उपमुख्यमंत्री झाल्याबद्दल रावेतकरांच्या वतीने मुकाई चौक येथे त्यांचे स्वागत आणि नागरी सत्कार करण्यात येणार आहे.



त्यानंतर १० वाजता वाल्हेकरवाडी येथे त्यांचे भव्य स्वागत आणि सत्कार करण्यात येणार आहे. चिंचवडमधील चापेकर चौकात सकाळी १०.१५ वाजता चिंचवडकरांच्या वतीने त्यांचे स्वागत आणि सत्कार होणार आहे. त्यानंतर १०.३० वाजता चिंचवड स्टेशन येथे आणि १०.४५ वाजता मोरवाडी चौक येथे अजितदादांचे जंगी स्वागत अन् सत्कार करण्यात येणार आहे. शहरातील प्रमुख चौकात जोरदार स्वागत झाल्यानंतर अजितदादा पवार हे पिंपरी चिंचवड महापालिकेत प्रशासकीय बैठक घेणार आहेत. पालिकेचे कामकाज, विविध प्रलंबित प्रकल्प, चालू कामे यांचा आढावा घेणार आहेत. तसेच राज्य सरकारशी संबंधित रखडलेली कामे देखील मार्गी लावण्यासंदर्भात आयुक्तांसोबत चर्चा करून निर्णय घेतील.

### कार्यकर्त्यांना संबोधित करणार

» चिंचवडमधील रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात दुपारी २ वाजता राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला आहे. तेथे अजितदादा कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. राष्ट्रवादीमधील फुटीनंतर अजितदादा उद्या पहिल्यांदाच पिंपरी चिंचवडमधील कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत.

# महापालिकेचे 'कृतज्ञतेचे तू करदाता, तू करविता 'इच वन थँक वन' अभियान!

## पहिल्या चार महिन्यांतच विक्रमी कराची वसुली

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महापालिकेच्या करसंकलन विभागाद्वारे नागरिकांना कर भरण्यास प्रवृत्त करण्यासाठी मिम्स नंतर रील्स स्पर्धेतून आवाहन करण्यात आले. नावीन्यपूर्ण उपक्रमांना करदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन मोठ्या प्रमाणात मालमत्ता कराचा भरणा केला. करदात्यांनी प्रामाणिकपणे कराचा भरणा केल्यानंतर महानगरपालिका जबाबदार करदात्यांबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तू करदाता, तू करविता; इच वन थँक वन अभियानातून करदात्यांचे आभार व्यक्त करणार आहे.

जन्मापासून ते मृत्यूपर्यंत दैनंदिन गरजांसाठी सामान्य नागरिकांच्या आयुष्यात महानगरपालिके सारखी मातृसंस्था महत्वाची भूमिका बजावते. महानगरपालिकेला कोणतीही सेवा देण्यासाठी निधीचे संकलन करणे अत्यावश्यक असते. महापालिकेचा करसंकलन विभागाच्या मालमत्ता कराचा महापालिकेच्या निधीमध्ये महत्वाचा वाटा आहे. लोकांसाठी आम्ही या तत्त्वाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने आजपर्यंत वाटचाल केली असून, आता जागरूक करदात्यांनी प्रामाणिकपणे भरलेल्या कराचा सकारात्मक परिणाम नागरिकांच्या समोर ;तू करदाता, तू करविता इच वन थँक वन अभियानातून मांडला जाणार आहे. महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या नेतृत्वाखाली आणि त्यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या अभियानातून करदात्यांचे आभार व्यक्त करण्यात येणार आहेत. नागरिकांना दिल्या जाणाऱ्या मूलभूत सोयी-सुविधांमधून जीवनमान उंचावण्याबरोबरच शहराचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी आज



सजग करदात्यांचा सहभाग मोलाचा आहे. चालू आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागाने पहिल्या चार महिन्यांत तब्बल ५०० कोटींचा कर संकलित केला असून, याबाबत महानगरपालिका करदात्यांबाबत अभियानाच्या माध्यमातून कृतज्ञता व्यक्त करणार आहे. त्यासोबतच नागरिकांनी प्रामाणिकपणे भरलेल्या कराचे सामान्य गोरगरीब नागरिकांना कोणत्या प्रकारे लाभ मिळाला, याचा लेखाजोखा करसंकलन विभागाद्वारे जनतेसमोर अभियानाच्या माध्यमातून मांडण्यात येणार आहे. यामध्ये वैद्यकीय सोयी-सुविधा, शैक्षणिक आर्थिक साहाय्य, गरजू नागरिक, अपंग, महिला, बालक यांना मिळणाऱ्या सवलती, अनुदान, कल्याणकारी योजनांतून ज्या नागरिकांनी लाभ घेतला आहे, अशा नागरिकांची करदात्यांबद्दल असणारी कृतज्ञता विभागाद्वारे जनतेसमोर मांडण्यात येणार आहे. यासाठी समाज माध्यमे, बातम्या, व्हिडिओज, ऑडियो, पोस्टर्स अशी विविध साधने वापरण्यात येतील. करवसुलीच्या रेकॉर्डमध्ये प्रामाणिक नागरिकांमुळे पहिल्या चार महिन्यांत विक्रमी कराची वसुली झाली आहे. त्यामुळे महापालिकेच्या तिजोरीमध्ये वाढ झाली असून, संबंधित निधीचा वापर शहराच्या विकासासाठी होणार आहे. नागरिकांना मूलभूत गरजांपासून ते पायाभूत सुविधा देण्याचे काम पालिकेचा प्रत्येक विभाग करीत आहे. आज जागरूक नागरिकांनी मालमत्ताकराचा विक्रमी भरणा केल्यामुळे महापालिका, करदात्यांना तू शहराचा करविता आणि तू शहराचा भाग्यविधाता म्हणून त्याचा सन्मान करीत आहे.

### नागरिकांच्या मनाचा ठाव घेणार

» तू करदाता, तू करविता इच वन थँक वन अभियानामार्फत करदात्यांचा सन्मान करताना पालिकेची करदात्यांप्रती कृतज्ञतेची भावना आहे. महापालिकेने सोशल मीडियाच्या माध्यमातून करदात्यांचे आभार व्यक्त करण्याचे अभियान सुरू केले असून, पालिकेच्या नावीन्यपूर्ण अभियानामध्ये तू करदाता, तू करविता इच वन थँक वन अभियान नागरिकांच्या मनाचा ठाव घेणारे ठरणार आहे. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, तू करदाता, तू करविता इच वन थँक वन अभियानातून करदात्यांचे आभार मानताना, पालिकेचे कार्य सांगण्याचा व त्यातून सामान्य नागरिकांच्या जीवनमानात झालेला बदल नागरिकांच्या समोर मांडण्यात येणार आहे. सुप्रशासनाचे (गुड गव्हर्नन्स) हे एक महत्वाचे अंग आहे. नागरिकांप्रती पालिकेचे असलेले उत्तरदायित्व अधोरेखित करण्याचा हा आमचा एक नम्र प्रयत्न आहे.

# पुणे रिंग रोड भूसंपादन प्रक्रियेला वेग!

## किती शेतकरी देणार जमीन? काय सांगते आकडेवारी?

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्याला वाहतूक कोंडीच्या चक्रव्यूहातून बाहेर काढण्यासाठीच्या ‘रिंग रोड’साठी १२ हजार शेतकऱ्यांनी जमीन देण्याची तयारी दर्शविली असून, त्यापैकी ८५ हेक्टर जागेची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. पुढील काही दिवसांत संमती दिलेल्या शेतकऱ्यांचे निवाडे जाहीर करून आणखी जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. ‘रिंग रोड’साठी आतापर्यंत संपादित केलेल्या जमिनीसाठी जिल्हा प्रशासनाने ४९१ कोटी रुपयांचा मोबदला दिला आहे. पश्चिम भागातील रिंग रोडच्या जमिनीचे फेरमूल्यांकन झाल्यानंतर त्या भागातील शेतकऱ्यांच्या जमिनीसाठीच्या संमतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. त्यासाठी संमतीपत्रे देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने २१ ऑगस्टपर्यंत अंतिम मुदत दिली होती. त्या मुदतीपर्यंत पश्चिम भागातील मावळ, मुळशी, हवेली आणि भोर तालुक्यातील एकूण ३५ गावांतील १६ हजार ९४० खातेदार (जमीनधारक) आहेत. त्यांच्या नावावर ७३८.६४ हेक्टर क्षेत्र आहे. एकूण खातेदारांपैकी दिलेल्या मुदतीत १२ हजार १६६ खातेदार शेतकऱ्यांनी जमीन देण्यास संमती दर्शविल्याने भूसंपादनाचा मार्ग मोकळा झाला आहे. पश्चिम भागातील ३५ गावांमधील ‘रिंग रोड’साठी २,४५५ गटातील जमीन संपादित केली जाणार आहे. त्यापैकी १,७७५ गटातील जमिनीला संमती मिळाली आहे. त्यापैकी आतापर्यंत २१ दिवसांत ४९१ हेक्टर एवढे क्षेत्र ‘रिंग रोड’ला देण्यास शेतकऱ्यांनी संमती दिली आहे, तर २४६ हेक्टर एवढे क्षेत्र संपादित करण्याचे आव्हान जिल्हा प्रशासनासमोर अद्याप बाकी आहे. ‘रिंग रोड’साठी संमती देणाऱ्या खातेदारांपैकी २३९ गटातील ९१४ खातेदारांच्या जमिनी संपादित करण्याची प्रक्रिया मावळ, मुळशी, भोर आणि हवेली तालुक्याच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी केल्या आहेत. त्यात आतापर्यंत सुमारे ८४ हेक्टर एवढी जमीन संपादित करून त्यापोटी सुमारे ४९१ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. यामध्ये सर्वाधिक मावळ तालुक्यात २१८ कोटी ६१ लाख रुपयांच्या मोबादल्याचे वाटप करण्यात आले आहे. मुळशी तालुक्यात ९४ कोटी ३३ लाख; तसेच हवेली तालुक्यात १४९ कोटी रुपये; तसेच भोर तालुक्यात २८ कोटी ५७ लाख रुपयांचे वाटप केले आहे. मावळ आणि हवेली तालुक्यात आतापर्यंत सर्वाधिक अनुक्रमे ३८ आणि ३४ हेक्टरएवढी जमीन संपादित करण्यात आली आहे.



### ३१ ऑगस्टपर्यंत निवाडे निश्चित

» मावळ, मुळशी, भोर आणि हवेली तालुक्यात संमती दिलेल्या क्षेत्रातील संपादित जमीन वगळता उर्वरित जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया बाकी आहे. ४९१.७४२ हेक्टर क्षेत्राच्या संपादनासाठी संमती मिळाली असली तरी त्यापैकी आतापर्यंत ८४ हेक्टर क्षेत्र संपादित झाले आहे. उर्वरित ४०७ हेक्टर क्षेत्राचे येत्या ३१ ऑगस्टपर्यंत निवाडे निश्चित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार पुढील निवाडे निश्चितीची प्रक्रिया सुरू होणार आहे, असे भूसंपादन समन्वयक प्रवीण साळुंखे यांनी सांगितले.

> **“संमती देणाऱ्यापैकी अनेक शेतकऱ्यांनी अटी टाकल्या आहेत. त्या अटीनुसार पैसे दिल्यास जमीन स्वीकारू असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र, विनाअट संमती दिलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे निवाडे येत्या ३१ ऑगस्टपर्यंत निश्चित करण्यात येणार आहेत. उर्वरित अटी ठेवलेल्यांची संमती फेटाळण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.**
> **- प्रवीण साळुंखे, समन्वयक, भूसंपादन**

# शरद पवारांनी शेतकऱ्यांना सतर्क केलं!

## कांद्यानंतर केंद्र सरकार कशाबद्दल घेणार वेगळा निर्णय

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** तत्कालीन केंद्रातील आघाडी सरकारने शेतकऱ्यांसमोर असणारे प्रश्न सोडविण्यासाठी शेतकरी हितासाठी ७६ लाख कोटी रुपयांचं कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला होता, असं शरद पवार म्हणाले.सध्या शेतकरी अडचणीत असून शेतकऱ्यांचे कर्ज माफ करा, लोकांना काम द्या, जनावरांना चारा द्या, पाणी द्या या सर्व गोष्टींच्या आवश्यकता आहे, त्याची जबाबदारी राज्यकर्त्यांनी गांभीरपणे घेतली पाहिजे हा आमचा आग्रह आहे, असं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले.

शरद पवार आज पुरंदर तालुक्याच्या दौऱ्यावर होते. येथील श्रीनाथ म्हस्कोबा देवस्थान ट्रस्ट संचलित सवाई मंगल कार्यालय लोकार्पण सोहळा पवार यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार सुप्रिया सुळे, आमदार संजय जगताप, माजी मंत्री शशिकांत शिंदे हे उपस्थित होते. शरद पवार म्हणाले की, सरकारने शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्ज माफ केले पाहिजे. केंद्र सरकार साखरे बाबत वेगळी भूमिका घेण्याच्या तयारीत दिसत आहे. त्यामुळे उसाला योग्य भाव देता येणार नाही. सरकारचं हे धोरण शेतकऱ्यांच्या हिताचे नाही त्यासाठी एकसंध राहुन अनुकूल धोरण राबवणे गरजेचे आहे. सध्या कांद्याचा प्रश्न निर्माण झाला. राज्यातील सत्ता ज्यांच्या हातात आहे. त्यांना या बदल किती आस्था आहे हे न बोलले बरं, असा टोला शरद पवार यांनी लगावला.शेतीतील पिंकाना रास्त किंमत द्या यासाठी शेतकरी रस्तावर बसत आहेत. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही, त्यांच्या मालाला दर देणे ही सरकारची जबाबदारी असल्याचेही पवार म्हणाले.. मुख्यमंत्री असताना पंढरपूर, जेजुरी, कोल्हापूर, तुळजापूर, बुलढाणा, शेवगावसह अनेक मंदिराचा चेहरा बदलण्याची खबरदारी घेत दरवर्षी पंचवीस कोटी रुपयांची तरतूद केल्याने या सुसज्ज मंदिरांमध्ये विविध सोयी उपलब्ध झाल्या. असेही पवारांनी सांगितले.




### सरकारने पाउले उचलणे महत्त्वाचे

» वीर धरणातील पाण्यामुळे पुरंदर, इंदापूर, बारामती भागातील अनेक शेती क्षेत्र बागायती झाली हे वीर धरणाचे उपकार शेतकरी कधी विसरणार नाही. पाऊस नाही धरणात पाणी नाही यासाठी सरकारने पाउले उचलणे महत्त्वाचे आहे. आपल्या काळात पाणी चारा नसल्याने छावण्या काढल्या पिण्याच्या पाण्यासाठी टँकरने पाणी दिले. बागायती भागात झांडाना पाणी देण्यासाठी निधी दिला, असेही पवारांनी यावेळी सांगितले.

# राष्ट्रवादीत कुठलीही फूट नाही!

## अजित पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते, आणि आमदार : सुप्रिया सुळे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** आमच्यापैकी काही जणांनी एक वेगळा निर्णय घेतलेला आहे, मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजिबात फूट पडलेली नाही, हे स्पष्ट आहे, असं राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी निक्षून सांगितलं. तर अजित पवार आमच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि आमदार आहेत. त्यांनी पक्षाच्या विरोधात काही भूमिका घेतल्यामुळे त्यांची तक्रार आम्ही विधानसभा अध्यक्षांकडे दिलेली आहे, अशी माहितीही सुळेंनी दिली.'अजित पवार यांचं पक्षातील सध्याचं स्टेटस काय?' असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता, 'अजित पवार आमच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि आमदार आहेत. आता त्यांनी पक्षाच्या विरोधात काही भूमिका घेतलेली आहे. त्याची तक्रार आम्ही महाराष्ट्र विधानसभेत अध्यक्षांकडे दिलेली आहे. त्यांच्या उत्तराची आम्ही वाट पाहतोय' असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. 'आमच्या पक्षाची भाजपशी कुठलीही युती किंवा आघाडी नाही. आमच्यापैकी काही लोकांनी एक वेगळा निर्णय घेतला. ते आमच्या लक्षात आलं, तेव्हा प्रक्रियेनुसार आम्ही विधानसभा अध्यक्षांकडे आमचं म्हणणं मांडलं आहे. राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये कुठलाही संभ्रम नाही. आम्ही



### सुप्रिया सुळे काय म्हणाल्या?

**» राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजिबात फूट पडलेली नाही, हे स्पष्ट आहे. आमच्यापैकी काही जणांनी एक वेगळा निर्णय घेतलेला आहे. याबद्दल त्यांची तक्रार आम्ही विधानसभा अध्यक्षांकडे केलेली आहे, प्रक्रिया सुरु आहे. राष्ट्रवादीचे देशाचे अध्यक्ष शरद पवार, तर महाराष्ट्राचे अध्यक्ष जयंत पाटील आहेत. त्या दोघांच्या नेतृत्वात आम्ही सगळे काम करतो, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.**

कुठल्याही गुप्त बैठका केलेल्या नाहीत. पवार आणि चोरडिया कुटुंबाची माझ्या आणि दादाच्या जन्माआधीपासून मैत्री आहे. त्यामुळे त्यांच्या घरी जाण्यात कसली चोरी आणि भीती?' असा प्रतिप्रश्न सुप्रिया सुळे यांनी विचारला. 'भाजपने आतापर्यंत तीन वेळा राष्ट्रवादी फोडण्यासाठी तीन वेळा प्रयत्न केले. भाजप त्यांची रणनीती सतत बदलत राहिलं, शरद पवारांचे सर्वांशी चांगले संबंध असल्याने भाजपकडून सातत्याने ऑफर येत होत्या, मात्र त्यांनी कधीही भाजपशी हातमिळवणी केली नाही. तिसऱ्या वेळी भाजपने सखोल रणनीती आखली आणि त्यांना यश आलं, ते राष्ट्रवादीला फोडण्यात यशस्वी झाले. राष्ट्रवादीचा गट सत्तेत आहे, पण तांत्रिकदृष्ट्या पक्षात फूट नाही' असं याआधी सुप्रिया सुळे यांनी एका इंग्रजी दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं होतं. 'अजित पवार यांनी लोकशाहीत एक नागरिक म्हणून त्यांचा निर्णय घेतला. अजित पवार परत येतील की नाहे हे मी सांगू शकत नाही. पवार कुटुंब एकत्र ठेवण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करु. कुटुंबात राजकारण येणार नाही, याची काळजी घेऊ' अशी ग्वाहीसुद्धा सुळेंनी दिली होती.

# पुणे-मुंबई अंतर अर्ध्या तासाने कमी!

## दादा भुसेंकडून मिसिंग लिंकच्या कामाची पाहणी

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे एक्स्प्रेसवे वर जी वाहतूक कोंडी होते त्याचा प्रश्न मिसिंग लिंकमुळे कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे. समृध्दी महामार्ग आपल्या भिवंडीपर्यंत जोडला गेला की एन एच ३ वरची वाहतूक याच्यावर परावर्तित होईल. यामुळे वाहतुकीचा प्रश्न बऱ्यापैकी निकाली निघेल, असं दादा भुसे म्हणाले. महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची कामं सुरू असल्याने महाराष्ट्राची प्रगती होणार आहे. सरकारकडून प्रकल्प पुढे न्याचे काम सुरू असून विकासाच्या दृष्टीने लौके उचलली जात असल्याचे मंत्री दादा भुसे यांनी सांगितले. लोणावळा परिसरात सुरू असलेल्या



### माझ्या वक्तव्याचा विपर्यास: भुसे

**» कांद्यावरून सध्या राज्याचे राजकारण सुरू आहे. त्यातच दादा भुसे यांनी केलेल्या वक्तव्यावरून राजकारण चांगलेच तापले होते. त्यावरून दादा भुसे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला गेला. माझं इतकेच सांगणं आहे की, आपण शेतकऱ्याची मुल आहोत. शेतकऱ्यांच्या मुलांना त्याचा मोबदला मिळावा एवढीच त्या मागची भावना होती, असे दादा भुसे यांनी सांगितले.**

मिसिंग लिंकच्या कामाची पाहणी केल्यानंतर दादा भुसे माध्यमांशी बोलत होते. मिसिंग लिंकचं काम पूर्ण झाल्यानंतर मुंबई पुण्याच्या प्रवासासाठी लागणारा वेळ अर्ध्या तासानं कमी होईल, असं दादा भुसे म्हणाले. दादा भुसे यांनी टनेलच्या कामाची पाहणी केली, त्या टनेलचं ७५ ते ८० टक्के काम पूर्ण झालेले आहे. आतापर्यंतचा सर्वात रुंदी आणि लांबी असलेला रस्त्यावरचा हा टनेल आहे, असं भुसे म्हणाले.

या टनेल मुळे मुंबई - पुणे रस्त्याचं अंतर सहा किमीनं कमी होणार आहे.त्यामुळे अर्धातास वेळ वाचणार आहे. दोन ते तीन तास पुण्यातून मुंबईला पोहोचायला लागतात. त्यात अर्धा तासाची बचत होणार आहे. या मध्ये सर्वात उंच सुमारे १८० मी उंचीचा पुल या ठिकाणी उभारला जातो आहे. जगातील आधुनिक तंत्रज्ञान वापरून या मिसिंग लिंकच काम सुरु आहे. २४ सप्टेंबर २०२४ पर्यंत याचे लोकार्पण होणार असल्याचे दादा भुसे यांनी सांगितले.

# महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आता 'तेजस्विनी'

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** रेल्वे प्रवास करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेषत: रात्रीच्या वेळी एकट्याने प्रवास करणाऱ्या महिलांची छेड काढण्याचे आणि त्यांना लुटण्याचे प्रकार वारंवार घडू लागले आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने तेजस्विनी पथकाची स्थापना केली आहे. या पथकातील महिला कर्मचारी रेल्वेने प्रवास करून महिलांच्या सुरक्षिततेची काळजी घेत आहेत. मध्य रेल्वेच्या पुणे विभागात रेल्वे सुरक्षा दलाने हे पथक स्थापन केले आहे. या पथकाकडे केवळ प्रवासी महिलाच नव्हे, तर मुलांच्या सुरक्षिततेचीही जबाबदारी आहे. तेजस्विनी पथकाचे काम स्वातंत्र्य दिनापासून सुरू झाले. या पथकात सहायक उपनिरीक्षक पूनम शर्मा आणि दोन महिला कर्मचारी आहेत. हडपसरच्या निरीक्षक प्रीती कुलकर्णी यांच्याकडे या पथकावर देखरेखीची जबाबदारी आहे. तेजस्विनी पथकाकडून दररोज डेक्कन, इंटरसिटी, सिंहगड एक्स्प्रेस आणि दैनंदिन लोकल गाड्यांमधील महिला प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या सुरक्षिततेविषयक अडचणी जाणून घेण्यात येत आहेत.महिलांवरील हिंसाचाराला आळा घालण्यासाठी रेल्वे हेल्पलाइन क्रमांक १३९ आणि विभागीय सुरक्षा नियंत्रण कक्ष क्रमांक ७२१९६१३७७० उपलब्ध आहेत.